पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक: २७/०७/२०२०**

# नक्षलवाद्यांचा घातपाताचा मोठा कट उधळण्यात गडचिरोली पोलीस दलास यश

- **सुमारे १० कि. ग्र. वजनाचा भूसुरुंग स्फोट गडचिरोली पोलीसांकडून निकामी.**
- **मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांच्याकडून जवानांचे कौतुक.**

नक्षलवाद्यांकडून दि. २८ जुलै ते ३ ऑगस्ट रोजी नक्षल सप्ताह पुकारण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलीस दलाने जिल्हाभरात नक्षलविरोधी अभियान तीव्र केले आहे. आज रोजी उपविभाग गडचिरोली अंतर्गत येणाऱ्या पोलीस मदत केंद्र रेगडी हद्दीतील मौजा रेगडी ते मौजा कोटमी रोडवर पोलीस मदत केंद्र रेगडीचे जवान रोड ओपनिंग करत असतांना नक्षलवाद्यांनी देशविघातक कृत्य व घातपाताच्या दृष्टीने भूसुरुंग स्फोट लावल्याचे निष्पन्न झाले.

पोलीस मदत केंद्र रेगडी येथील प्रभारी अधिकारी यांनी तात्काळ मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलश बलकवडे साो. यांच्याशी संपर्क साधत सदर बाबीची माहिती दिली. मा. श्री. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे साो. यांच्या मार्गदर्शनाखाली बॉम्ब शोधक व नाशक पथक गडचिरोली यांना तात्काळ घटनास्थळी रवाना केले. बॉम्ब शोधक व नाशक पथकाने अत्यंत सावधानता बाळगत बहादुरीने नक्षलवाद्यांनी लावलेला सुमारे १० कि. ग्र. वजनाचा भूसुरुंग स्फोट निकामी करण्यात यश प्राप्त केले.

नक्षलवाद्यांनी पुकारलेल्या बंदच्या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलीस दलाने सदर भूसुरुंग स्फोट निकामी करण्यात यश मिळविल्याने नक्षलवाद्यांचे मनसुबे उधळवून लावण्यात गडचिरोली पोलीस दल यशस्वी झाले आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे साो. यांनी पोलीस मदत केंद्र, रेगडी तसेच बॉम्ब शोधक व नाशक पथक गडचिरोली येथील संपुर्ण टिमचे अभिनंदन करत त्यांना रोख पारितोषिक जाहिर केले आहे.







